प्रसिध्दी पत्रक　　　　　　　　　　दिनांक : ०४/०७/२०२४

**टि.सी.देण्यासाठी बारा हजाराचे कुलर मागणारे संस्थाचालक मनोहर पवार यांच्यासह प्राचार्य लोकसेवक बहिनाजी वरवंटे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पोस्टे कुंदुर |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं १०९/२०२४ कलम ७,१२ भ्र.प्र.अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०३.०७.२०२४ रोजी १७.०४ वाजता स्टे.डा २० वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १. श्री. मनोहर पुंडलिकराव पवार, संस्थाचालक, विद्या विकास शिक्षण प्रसारक मंडळ व मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोमठाणा ता.नायगाव, जि.नांदेड<br>२. श्री. बहिनाजी वरवंटे, मुख्याध्यापक तथा प्राचार्य, मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा ता.नायगाव, जि.नांदेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १२,०००/- किंमतीचे सिम्फनी कंपनीचे कुलरची मागणी करून तडजोडीअंती रु. ३,०००/- ची मागणी |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची मुलगी ही मास्टर दिनानाथ मंगेशकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोमठाणा, ता.नायगाव येथून १२ वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झाली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीची टी.सी. काढण्या करीता नमुद शाळेत जावून संस्थाचालक मनोहर पवार यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांच्या मुलीची टि.सी. देण्याकरीता १२,०००/- रूपये किंमतीचे सिम्पनी कंपनीचे कुलरची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी नाइलाजास्तव होकार दिला. सदर वस्तूची मागणी ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने व त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दि. ०२.०७.२०२४ रोजी याबाबत तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून दि. ०२.०७.२०२४ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता, लाच मागणी पडताळणी दरम्यान यातील आरोपी मुख्याध्यापक तथा प्राचार्य लोकसेवक क्रमांक २ बहिनाजी वरवंटे यांनी त्यांचे मोबाईल वरून आलोसे क्र. १ मनोहर पवार यांना संपर्क केला. त्याच मोबाईल फोनवरून तक्रारदार हे आलोसे क्र. १ मनोहर पवार यांना त्यांच्या मुलीची १२ वी उत्तीर्ण झाल्याची टि.सी. मिळणे संबंधाने बोलले असता त्यांनी तडजोडीअंती रूपये ३,०००/- स्वत:चे फायदयाकरिता पंचासमक्ष मोबाईल फोनद्वारे लाचेची मागणी करून लाच रक्कम कॉलेजचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य वरवंटे यांचेकडे देण्याचे सांगून लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर तक्रारदार हे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य बहिनाजी वरवंटे यांचेकडे त्यांच्या मुलीची टि.सी. संबंधाने बोलले असता त्यांनी आलोसे क्र. १ मनोहर पवार यांच्या मागणी प्रमाणे रक्कम घेवून या, असे म्हणून पंचासमक्ष रु. ३०००/- लाच रक्कम देण्यास तक्रारदार यांना प्रोत्साहीत केले.<br>नमुद प्रकरणात आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन नांदेड कुंदुर जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला. |
| मार्गदर्शक | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :- 02462-253512<br>टोल फ्री कमांक- 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई-मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई-मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक * ला.प्र.वि.नांदेड,युनिट *

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner